क्र.पोमसं/३१/३९-१/पोलीस अंमलदार-घबांअ-७६१०/१०५/२०२२ मुंबई, दि.०८ /०१/२०२३

विषय - पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार यांच्या घरबांधणी अग्रिमाबाबत.

*****

**परिपत्रक**

राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यासाठी बँका/ वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्यामार्फत रक्कम वितरीत करण्यास शासनाने दि.१०/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी दिली होती. त्याअनुषंगाने माहे मे २०१९ पर्यंत एकूण रु.८६८.५० कोटी इतके घरबांधणी अग्रिम वितरीत करण्यात आले आहे. तथापि, माहे मे २०१९ पासून सदर घरबांधणी अग्रिमाचे अर्ज प्रलंबित आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचा शासन निर्णय क्र.घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनियम, दि.०२/०२/२०२१ अन्वये सातव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या १०० पट रक्कम मंजुर करण्याबाबत मंजूरी देण्यात आलेली आहे. घर बांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअर मध्ये भरण्यात आलेले सर्व अर्ज हे सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सादर करण्यात आलेले आहेत. घर बांधणी अग्रिमचे सॉफ्टवेअर सातव्या वेतन आयोगाप्रमाणे अद्यावत करण्याबाबतची कार्यवाही सुरु असुन सर्व घटक कार्यालयाने खालील मुद्दयाच्या अनुषंगाने **तात्काळ** कार्यवाही करावी.

- **ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वाढीव घरबांधणी अग्रिमाची मागणी करावयाची आहे, त्यांचे पूर्वी केलेले अर्ज रद्द करण्याबाबत या कार्यालयास कळवावे.** घर बांधणी अग्रिमचे सॉफ्टवेअर सातव्या वेतन आयोगाप्रमाणे अद्यावत झाल्यानंतर तसे सर्व घटक कार्यालयास कळविण्यात येईल. त्यानंतर सदरचे रद्द केलेले अर्ज पुन्हा सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सॉफ्टवेअर मध्ये भरावेत.
- ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी घरबांधणी अग्रिम मंजूरीसाठी सॉफ्टवेअर मध्ये अर्ज सादर केले आहेत, परंतु त्यांची सेवा पाच वर्षापेक्षा कमी शिल्लक आहे, त्यांची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील परिशिष्ठ-१ प्रमाणे या कार्यालयास सादर करावी.
- ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी घरबांधणी अग्रिम मंजूरीसाठी अर्ज सॉफ्टवेअर मध्ये सादर केला आहे, परंतू त्यांना अत्ता अग्रिमची आवश्यकता नाही, त्यांची यादी (सोबत जोडलेल्या विरणपत्रामधील परिशिष्ठ-२ प्रमाणे) या कार्यालयास सादर करावी.
- तसेच ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी घरबांधणी अग्रिम मंजूरीसाठी अर्ज सॉफ्टवेअर मध्ये सादर केला आहे, परंतू त्यांची बदली दुसऱ्या घटक कार्यालयात झालेली आहे, त्यांचे अर्ज सॉफ्टवेअर मधून बदली झालेल्या घटक कार्यालयास पाठवावेत.

तरी, सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, वरील मुद्दयाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन दि.**१६/०१/२०२३** रोजी पर्यंत वरील मुद्दयाबाबतची माहिती (परिशिष्ठ १ ते ४) या कार्यालयास(कार्यासन क्र.३१ मध्ये ) खास दुतामार्फत पाठवावी. **या कार्यालयास वेळेत माहिती प्राप्त न झाल्यामुळे संबंधीत पोलीस अधिकारी /अंमलदार यांना घरबांधणी अग्रीम मंजूर झाले नाही, तर त्यास संबंधीत घटक कार्यालय जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.**

(अनुप कुमार सिंह)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,
पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई

80

Scanned by Scanner Go

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म. राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,(रेल्वेसह) (बृहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, पुणे/वाहतूक, मुंबई/ रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई/ फार्सवन, म.राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
संचालक, न्याय सहायक वैद्यकीय प्रयोगशाळा, नाशिक/ पुणे/ कोल्हापूर/ नांदेड/ औरंगाबाद/ नागपूर/ अमरावती
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/ नागरी हक्क संरक्षण, मुंबई /मोटार परिवहन,पुणे/रा.रा.पो.बल नागपूर/पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे/पूर्व विभाग, नागपूर/विशेष कृती दल नागपूर/नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र, गोरेगांव, मुंबई/ अंगुली मुद्रांक, मुंबई
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे /अ.अ.प्र.के., नागपूर
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १९/राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर/ धुळे
अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोंकण, नवी मुंबई / पुणे / कोल्हापूर / औरंगाबाद / नांदेड / नागपूर / नाशिक /अमरावती/ ठाणे
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / अमरावती / नागपूर / औरंगाबाद/कोंकण भवन, नवी मुंबई/नाशिक / कोल्हापूर

Scanned by Scanner Go

## परिशिष्ठ-१/ Appendix-I

### सेवानिवृत्ती करीता पाच वर्षापेक्षा कमी सेवा शिल्लक असलेले पोलीस अधिकारी/ अंमलदार

**Details of the applicants with Less than Five Years of Service left for Retirement**

| अ.क्र. Sr.No. | नाव Name | सेवार्थ ID Sevarth ID | सेवानिवृत्ती दिनांक Date of Retirement |
|---|---|---|---|
| | | | |

## परिशिष्ठ-२/ Appendix-II

### घरबांधणी अग्रिम अर्ज रद्द झालेले पोलीस अधिकारी/ अंमलदार

**Details of the applicants whose application has been cancelled.(HBA not needed)**

| अ.क्र. Sr.No. | नाव Name | सेवार्थ ID Sevarth ID | अर्ज भरल्याचा दिनांक Date of Application |
|---|---|---|---|
| | | | |

## परिशिष्ठ-३/ Appendix-III

### सातव्या वेतन आयोगाप्रमाणे नवीन अर्ज सादर करणाऱ्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे बाबत

| अ.क्र. Sr.No. | नाव Name | सेवार्थ ID Sevarth ID | अर्ज भरल्याचा दिनांक Date of Application |
|---|---|---|---|
| | | | |
| **ज्या पोलीस अधिकारी / अमंलदार यांनी या पूर्वी घरबांधणी अग्रिमकरीता अर्ज सादर केला, परंतु त्यांना आत्ता सातव्या वेतन आयोगाप्रमाणे घरबांधणी अग्रिम घेवयाचे आहे, त्यांची माहिती वरील प्रमाणे पाठवावी.** | | | |

## परिशिष्ठ-४/ Appendix-IV

### सदर कामकाज करणाऱ्या अधिकारी/ लिपीक यांचे बाबात

**Information regarding the officer/clerk dealing with HBA.**

| अ.क्र. Sr.No. | नाव Name | घटक कार्यालयाचे नाव Office Name | Axis Bank Account No and IFSC Code. | मोबाईल नंबर Mobile No. |
|---|---|---|---|---|
| १ | संबंधीत कार्यासन अधिकारी/ Desk officer | | | |
| २ | आहरण व संवितरण अधिकारी / D.D.O. | | | |
| ३ | संबंधीत लिपीक/ Corresponding Clerk | | | |
| **सोबत घर बांधणी अग्रिमच्या Axis Bank च्या खात्याच्या Cancel चेकची छायांकीत प्रत जोडावी.** | | | | |

Scanned by Scanner Go